**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – दिलीप बाळकृष्ण जोशी , वय – ५९ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा – सडे वाघोटण– वाघोटण, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर वादीचे विधीज्ञ श्री. पी.व्ही.बोडस यांचे मार्फत.**

०१. मी माझ्या लहानपणापासून मौजे सडे वाघोटण येथे राहतो. माझ्या वडिलांचे बाळकृष्ण विष्णू जोशी असे आहे. ते देखील सडे वाघोटण येथे राहत असत. माझे वडील सही करत असे. मी पाहिल्यास माझ्या वडिलांची सही ओळखू शकतो. (प्रतिवादी तर्फे वकील श्री. बी.एम.दळवी यांनी असा आक्षेप नोंदवला की, वादीतर्फे वकील हे मृत्यूपत्राच्या रजिस्टरवरुन घेतलेल्या झेरॉक्स स.शि. नक्कल दाखवत आहेत. वादीच्या वकिलांनी असे सांगितले की, कागदपत्र साक्षीदारास कोणता दाखवावा यास काही बंधन नाही.) (सदर आक्षेपाचा निर्णय अंतिम युक्तीवादावेळेस घेण्यात येईल. सध्य स्थितीत साक्षीदार यास कागदपत्र दाखविण्यास परवानगी देण्यात येते.) आता साक्षीदार यास नि.क्र.१२८ अ.क्र.१ येथील दि.१५/१०/१९९० रोजीच्या मृत्यूपत्राची दुय्यम निबंधक कणकवली यांनी हजर केलेल्या मृत्यूपत्राच्या रजिस्टरवरुन घेतलेल्या झेरॉक्स स.शि. नक्कल दाखविण्यात आली. त्यावर साक्षीदार सदरी अ.क्र.२ येथे माझ्या वडिलांची सही आहे. सदर सही मी ओळखतो.

सरतपास पूर्ण

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु .**

०२. मला साक्षीला येण्यापुर्वी वादी भेटले नव्हते. माझे वादी याच्याशी बोलणे झाले नव्हते. मला दाखविण्यात आलेल्या मृत्यूपत्राबद्दल माझे वडिलांशी बोलणे झाले नव्हते. माझ्या वडिलांच्या सह्या असणारे कोणतेही कागद आता माझ्याकडे उपलब्ध नाहीत. मी असे कोणतेही कागद न्यायालयात हजर करु शकत नाही. साक्षी समन्स प्राप्त झाल्यापासून माझे वकिलांशी कोणतेही बोलणे झाले नाही. साक्षी समन्स प्राप्त झाल्यापासून मी वकिलांच्या कार्यालयात गेलो नाही. वादीचे वकील माझ्या परिचयाचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविलेल्या दस्तावरील सही माझ्या वडिलांची असून ती मी ओळखल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे

नाही की, वादी याच्या सांगण्यावरुन आज मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-
(श्रीकांत एस. पचंडी )
दि.०८/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड